


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ११४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०७ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# उपमुख्यमंत्रीपदही रद्द करा, उद्धव ठाकरेंची सरकारकडे मोठी मागणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०६, मुंबई :** शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यातील नगरपालिका निवडणुका, मतदार याद्यांमधील त्रुटी, शेतकरी पॅकेज आणि विरोधी पक्षनेतेपद यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवरून सध्याच्या सरकारवर जोरदार टीका केली आहे. निवडणुकांमध्ये हुकूमशाही वाढत असून 'बूथ कॅप्चरींग' ऐवजी आता 'निवडणूकच कॅप्चर' करण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

मतदार याद्यांमधील घोळ इतका मोठा आहे की, सर्वोच्च न्यायालयाने यावर स्वतःहून लक्ष घालून लोकशाहीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या विषयावर त्वरित हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली. जोपर्यंत मतदार याद्यांमधील विसंगती दूर होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नयेत, असेही ते म्हणाले. ठाकरे यांनी राज्यात विरोधी पक्षनेतेपद अद्यापही रिक्त ठेवल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनापासून या पदाची मागणी असूनही एक वर्षानंतरही ते रिक्त आहे, हे इतिहासात प्रथमच घडत आहे, असे ते म्हणाले. सरकारला विरोधी पक्षनेतेपदाची भीती का वाटते, असा सवाल त्यांनी उपस्थित



केला. जर कायद्याचा हवाला देऊन ही भूमिका घेतली जात असेल, तर उपमुख्यमंत्रीपदाचे कायदेशीर अस्तित्व नसल्याने तेही रद्द करावे, अशी मागणी त्यांनी केली.

शेतकरी पॅकेजबाबत बोलताना ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली. मुख्यमंत्र्यांना केवळ उलट उत्तर देता येते, सरळ उत्तर देत नाहीत, असा आरोप त्यांनी केला. केंद्र सरकारचे आभार मानताना, केंद्रीय कृषी मंत्र्यांनी राज्य सरकारची 'सोंग उघडली', त्यामुळे त्यांचे आभार, असे उपहासाने सांगितले. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ओला दुष्काळ ही संज्ञा नाही असे म्हटल्याने तो टाळला जाऊ शकत नाही, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्यक्ष पैसे कधी येणार आणि प्रस्ताव सादर झाल्यानंतर प्रक्रिया किती वेळ घेणार, याबाबतही ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या तीन पक्षांचे नाव वेगवेगळे पण मालक एकच या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना ठाकरे म्हणाले, तिन्ही पक्षांचे नेते एकच आहेत, प्रत्यक्षात त्यांची बी-टीम आहे. दिग्विजय सिंह यांच्या भेटीवर ठाकरेंनी खुलासा केला की, ही वैयक्तिक भेट होती. आमची ओळख पूर्वीपासून आहे. ते बर्याच दिवसांनी मुंबईत आले होते, त्यामुळे भेट झाली, असे त्यांनी सांगितले.

सरकारवर कठोर टीका करताना ठाकरे यांनी लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप केला आणि आगामी निवडणुका पारदर्शक रित्या पार पडाव्यात, अशी मागणी केली.

## एमडी ड्रग्ससह २ लाखांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.०६, चंद्रपूर :** ड्रग्स माफियाकडून एमडी ड्रग्स पावडरसह २ लाख २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई दि. ४ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. आरोपीचे नाव प्रांजल राकेश तिवारी (२४) व अदनान जाकीर शेख (२४) असे आहे.

जिल्ह्यात प्रोव्हीशन, जुगार रेड, तसेच अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करणे कामी रवाना होऊन पेट्रोलिंग करीत असताना आरोपी प्रांजल राकेश तिवारी व अदनान जाकीर शेख हे मोटार सायकलने नागपूर रोड, धाब्याजवळ, चंद्रपूर येथे येत आहे अशा माहितीवरुन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचेकडून १३.५० ग्रॅम एम.डी ( मेफोड्रॅान) सदृश्य पांढरे रंगाचे ड्रग्स पावडर व मोटार सायकल, नगदी रुपये तसेच दोन मोबाईल असा एकूण २ लाख २३० रुपयांचा माल जप्त करुन आरोपितांविरुध्द पोलीस स्टेशन, रामनगर येथे गुन्हा नोंद केला आहे.

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात पोउपनि विनोद भुरले, सुनिल गौरकार, सुभाष गोहोकार, सतिश अवथरे, रजनिकांत पुठ्ठावार, दिपक डोंगरे, इम्रान खान, किशोर वाकाटे, शशांक बदामवार, हिरालाल गुप्ता यांनी केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि निलेश वाघमारे करीत आहे.

## पुढे ढकललेल्या निवडणुकीतील उमेदवारांच्या खर्चावर तात्काळ दिलासा द्या

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.०६, चंद्रपूर :** महाराष्ट्रातीस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगर परिषद व नगर पंचायत) निवडणुका न्यायालयीन प्रक्रियेमुळे पुढे ढकलल्या गेल्याने, उमेदवारांच्या निवडणूक खर्चाचे व्यवस्थापन एक कळीचा मुद्दा बनले आहे. या पार्श्वभूमीवर, खा. प्रतिभा धानोरकर यांनी मुख्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे एक अत्यंत महत्वपूर्ण मागणी केली आहे. उमेदवारांना आर्थिक ताणातून दिलासा देण्यासाठी, निवडणूक खर्चाची गणना नवीन वेळापत्रकानुसार निवडणूक चिन्ह वाटपाच्या दिवसापासून (११ डिसेंबर) सुरु करावी, अशी स्पष्ट भूमिका खा. प्रतिभा धानोरकर यांनी मांडली आहे.

यापूर्वी झालेला सर्व खर्च निवडणूक खर्च म्हणून ग्राह्य धरु नये, अशी त्यांची आग्रही विनंती आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी मुख्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांना पत्र लिहून, सध्याच्या न्यायालयीन प्रक्रिया व निवडणूक आयोगाच्या आदेशामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमधील उमेदवारांच्या खर्चाबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करण्याची विनंती केली आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी पत्रात नमूद केले आहे की, न्यायालयीन प्रक्रिया व आयोगाच्या आदेशानुसार, ज्या निवडणुका पुढे



ढकलण्यात आल्या आहेत, त्यासाठी उमेदवारांनी यापूर्वी केलेला सर्व खर्च हा निवडणूक खर्च म्हणून ग्राह्य धरु नये. उमेदवारांवर अनावश्यक आर्थिक ताण पडू नये आणि निवडणुकीत समान संधी मिळावी यासाठी, निवडणुकीच्या नव्या वेळापत्रकानुसार दि. ११ डिसेंबर रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांची मागणी आहे की, ११ डिसेंबर रोजी निवडणूक चिन्ह वाटप झाल्यानंतर, त्या दिवसापासून उमेदवारांनी केलेला प्रत्येक खर्च हा निवडणूक खर्च म्हणून ग्राह्य धरण्यात यावा, तर या तारखेपूर्वी झालेला खर्च कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरला जाऊ नये. खा. प्रतिभा धानोरकर यांनी या अतिशय महत्वाच्या मागणीचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन, संबंधित जिल्हाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणुकीतील उमेदवार यांना या संदर्भात स्पष्ट व त्वरीत मार्गदर्शक सूचना त्वरित निर्गमित करण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## नागपुरात कुख्यात बाबाला अटक
## पोलिसांनी सापळा रचला अन् आरोपीच्या नांग्या ठेचल्या



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.०६, दि.०६, नागपूर :** नागपूर पोलिसांनी एका कुख्यात गुन्हेगाराला अटक केली आहे. तो एका खून प्रकरणात जेलमध्ये होता. तसेच तो जामिनावर जेलमधून बाहेर पडला. यानंतर तो आता ड्रग्जची तस्करी करताना पकडला गेला आहे. पोलिसांनी सापळा रचून या कुख्यात आरोपीला अटक केली आहे. पोलिसांच्या या कारवाईची सध्या नागपुरात चर्चा होत आहे. विशेष म्हणजे हा आरोपी ड्रग्जची विक्री का करत होता? याचं कारणदेखील समोर आलं आहे. उधारीच्या पैशांची परतफेड करण्यासाठी त्याने ड्रग्ज विक्रीचा मार्ग अवलंबल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. तसेच पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. आरोपीला नेमके ड्रग्ज कोणी दिले, तसेच या प्रकरणात आणखी कुणाचा समावेश होता का? याबाबतच्या तपासात आगामी काळात कदाचित महत्त्वाची माहिती मिळू शकते.

*** नेमकं प्रकरण काय?**

हेअर प्लान्टेशनसाठी आणि खुनाच्या गुन्ह्यात जामिनावर सुटण्यासाठी झालेल्या खर्चाची परतफेड करण्याकरिता एमडी विक्री करणाऱ्या कुख्यात गुन्हेगाराला कळमना पोलिसांनी सापळा रचून अटक केली. कादिर ऊर्फ बाबा जाकीर खान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. तो २३ वर्षांचा असून कळमनाच्या गुलशननगर येथील राहणारा आहे. बाबा हा कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्याविरूद्ध ड्रग्ज तस्करी आणि खुनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. एका खूनप्रकरणात बाबा हा कारागृहात होता. जामीन मिळविण्यासाठी त्याला लाखो रुपयांचा खर्च आला. यासाठी त्याच्या नातेवाइकांनी खर्च केले. जामिनावर सुटल्यानंतर आरोपी बाबा याने हेअर ट्रान्सप्लान्टेशन केले. यासाठीही त्याला मोठ्या प्रमाणात पैसे लागले. ही रक्कम त्याने उधार घेतली. उधार घेतलेल्या पैशांची परतफेड करण्यासाठी त्याने ड्रग्ज विक्रीला सुरूवात केली. बाबाने मुंबईहून एमडीची मोठी खेप बोलावल्याची माहिती कळमना पोलिसांना मिळाली.

## सौर ऊर्जा उपलब्धतेमुळे विजेच्या दरात कपात करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.०६, मुंबई :** देशात महाराष्ट्र सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६ हजार मेगावॅट निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅबेले यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री मेघना साकोरे -बोर्डीकर, आमदार संजय केणेकर, नारायण कुचे, प्रशांत बंब, सुरेश धस, अनुराधा चव्हाण, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

**सौरपंप स्थापित करण्याच्या क्षमतेत वाढ !**



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू, जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना खूप चांगली असल्याने अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी, असे पत्र केंद्रांमार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार 'कुसुम' ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ करुन आपण प्रतिक्षा कालावधी कमी केला. महावितरणचे कर्मचारी अधिकारी. सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख्या १० लाख झाली पाहिजे, असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

**सौर ऊर्जेद्वारे १६ हजार मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारे सौर ऊर्जेचा वापर वाढवून आपण शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र १६ हजार मेगा वॅट वीज निर्मिती करु शकतो. शिवाय ही वीज निर्मिती कोणत्याही प्रदूषणाशिवाय असेल. तिचा निर्मिती खर्च कमी असल्याने इतर क्षेत्राला लागणारी वीज मुबलक आणि स्वस्तात उपलब्ध होईल. त्यामुळे दरवर्षी ३ टक्क्यांनी आपण विजेचे दर कमी करु, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा !**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे सांगितले की, सौर ऊर्जेचा वापर वाढल्यामुळे सौर ऊर्जा उपकरण निर्मिती कंपन्या, वेंडर्स, कामगार, देखभाल करणारे अशा १ लाख लोकांना रोजगार मिळाला. त्यामुळे ऊर्जाक्षेत्राला नवी दिशा देणारी ही योजना आहे.

**मराठवाड्याचा वाटा मोठा !**

मराठवाड्याचे कौतुक करतांना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या योजनेच्या अंमलबजावणीत मराठवाड्याने आघाडी घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजार पंप लावण्यात आले. शेतकऱ्यांना नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजनेमार्फत अन्य लाभ, बाजाराची उपलब्धता देऊन शेती शाश्वत कशी होईल, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. नदी जोड सारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून वाहून जाणारे पुराचे पाणी मराठवाड्यात, विदर्भात व उत्तर महाराष्ट्रात नेऊन दुष्काळ मुक्ती करायची आहे. या सर्व उपाययोजनांमुळे शेती समृद्ध आणि शाश्वत होईल. आमचे सरकार हे शेतकऱ्यांप्रती समर्पित सरकार असून शेती शाश्वत होईपर्यंत आम्ही प्रयत्न करीत राहू, असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

**महाराष्ट्र थांबणार नाही!**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यातील जनतेचे आभार व्यक्त केले. जनतेला समर्पित वर्ष होते. सगळ्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तनसाठी योजना आणल्या त्या कार्यान्वित केल्या. महाराष्ट्र थांबणार नाही, असाच पुढे जात राहील, हा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

अक्षराज






## फास्टफुड आरोग्यास घातक



आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेतः शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात. जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

# महाराष्ट्रात राजकीय जंगलराज...?

ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.
मु.पो.मासा बेलेवाडी.
कागल-कोल्हापूर.

कोल्हापूरमधील कुस्तीचे आखाडे अवघ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. हार-जीतचा फैसला काही क्षणात आखाड्यातच होतो आणि होतो आणि आखाड्याबाहेर आल्यावर एकमेकांविरुद्ध लढलेले पैलवान पुन्हा मित्र होतात. महाराष्ट्राचाही असाच राजकीय आखाडा बनला आहे.

मात्र, या आखाड्यात लढणारे निवडणुकीनंतर मित्र होत नाहीत, हे दुर्दैव आहे. दोन दिवसांपूर्वी म्हणजे २ डिसेंबरला राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका झाल्या. निवडणुकीच्या निमित्ताने राज्य निवडणूक आयोगाने जेवढा घोळ घातला त्यापेक्षा जास्त गोंधळ मतदान सुरू असताना अवघ्या महाराष्ट्राने पाहिला. शांतताप्रिय, शिस्तप्रिय, पुरोगामी या सगळ्या बिरुदांना पायदळी तुडवलेले संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. राजकीय पक्षाच्या निष्ठेसाठी एकाच गावात राहणारे, एकाच शहरात राहणारे एकमेकांच्या जीवावर उठलेले पाहून महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली. महाराष्ट्रात जे होत नव्हते, होऊ नये, असे म्हटले जायचे ते सर्व झालेले पाहायला मिळाले. खरेतर राजकारण वेगळे आणि वैयक्तिक संबंध वेगळे असतात. राजकीय शत्रू असले तरी व्यक्तिगत मैत्री उत्तम असू शकते, ही महाराष्ट्राची राजकीय संस्कृती राहिली आहे.

खुद्द बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यात प्रचंड वैचारिक मतभेद होते. दोघांचे राजकीय पक्ष वेगळे होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी शरद पवारांवर अनेकदा जाहीर सभेत जहरी टीका केली होती. मात्र, त्यांच्यातील मैत्रीही तेवढीच गाढ होती. राजकीय व्यासपीठावरून टोकाची टीका केल्यानंतरही एकमेकांच्या घरी जाताना किंवा एकत्र आल्यावर राजकीय वहाणा ते घराबाहेर ठेवत असत. यशवंतराव चव्हाण यांनी विरोधकांच्या टीकेचाही सन्मान केला. पातळी सोडून टीका होत नव्हती. दुर्दैवाने आजच्या बहुतांश राजकीय मंडळींना हे जमत नाही. त्यातही कार्यकर्ता पातळीवर याची जाण नसल्याने एकाच गावात, शहरात राहूनही एकमेकांशी भिडतात, शत्रूत्व स्वीकारतात. हे राज्यभरातील दृश्य महाराष्ट्राने २ डिसेंबर रोजी विविध माध्यमांवर पाहिले. निवडणूक हा लोकशाहीचा मोठा आधारस्तंभ आहे. त्यामुळे निवडणुका नेहमीच सकारात्मक दृष्टीने, विकासाच्या मुद्द्यावर व्हाव्यात आणि निरपेक्षवृत्तीने लढाव्यात, अशी अपेक्षा असते.

त्यातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असतील तर तिथं राजकीय पक्षांपेक्षा स्थानिक आघाड्यांना महत्त्व येते. गावातील किंवा छोट्या शहरातील आपलीच व्यक्ती निवडणुकीला उभी राहते. त्यामुळे तिथे वैचारिक मतभेद असले तरी वैयक्तिक शत्रूत्व नसते. नसते. मागील काही निवडणुकांमध्ये हे चित्र बदललेले दिसले. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते, त्यांच्यात हाणामाऱ्या झाल्या, रिव्हॉल्वर काढण्यापर्यंत मजल गेली. हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला मुळीच शोभणारे नाही. मात्र, काही वर्षांमधील चित्र पाहिले तर विविध राजकीय पक्षांतील नेत्यांमधील संबंध दिवसेंदिवस ताणलेले आहेत. जिथे राजकीय नेत्यांमधून विस्तव जात नाही, जे जाहीरपणे एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढतात, जे जाहीर असंसदीय शब्दांचा वापर करतात त्यांच्या कार्यकर्त्यांनी नेत्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवल्यास कुणाला आश्चर्य वाटण्याचे फारसे कारण नाही. म्हणूनच नगरपंचायत आणि नगरपरिषदांसाठी मतदान सुरू असताना अनेक ठिकाणी प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. राजकीय नेते एकमेकांवर चिखलफेक करत असतात. त्यामुळे आपला राजकीय आणि वैयक्तिक शत्रू कोण, हे आता कार्यकर्त्यांना समजू लागले आहे.

मात्र, कधी कधी कट्टर राजकीय विरोधक त्यांची राजकीय गरज ओळखून एकत्र येतात, तेव्हा कार्यकर्त्यांना काय करावे सुचत नाही. याचीच जाणीव कार्यकर्ते ठेवत नाहीत. निवडणूक संपली की पुन्हा एकत्र यायचं आणि सर्वांनी मिळून विकासाला हातभार लावायचा, मतभेदाला तिलांजली द्यायची, हे ऐकायला-वाचायला आदर्श वाटत असले तरी प्रत्यक्षात उतरत नाही. कारण निवडणुकीच्या प्रचारात किंवा आधीही समोरची व्यक्ती राजकीय पक्ष म्हणून विरोधक आहे. मात्र, वैयक्तिक भांडण नाही, हे कुणी लक्षात घेत नाही. त्यातच अनेकांची निष्ठा पक्षाशी नसून व्यक्तीशी असते. व्यक्तिपूजेला महत्त्व दिले की मग सारे काही त्या व्यक्तीच्या मनाप्रमाणे करायचे असते, त्यांच्यासाठी निवडणूक लढवायची, त्यांच्यासाठी भांडण करायचे असते, त्यांच्यासाठी विनाकारण दुसऱ्याशी शत्रूत्व स्वीकारायचे, असे होत जाते. आताच्या कार्यकर्त्यांनी हाच गुण स्वीकारल्यामुळे आपल्याकडील कार्यकर्ते परिणामांचा विचार करत नाहीत.

त्यामुळे पुढचा विचार न करता रस्त्यावर मारामारी करण्यात पुढे होतात, पोलीस केसेस अंगावर घेतात. हे सर्व या निवडणुकीत दिसले. बरे हाणामारी हा एकच मुद्दा नाही तर लोकप्रतिनिधींनी कसे वागायचे असते, याचेही ताळतंत्र सोडून दिल्याचे दिसले. बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या मुलाने पोलिसांनी पकडलेल्या बोगस मतदाराला सोडून देण्यास मदत केली. हे सर्व माध्यमांच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहे. तर हिंगोलीचे शिवसेना आमदार संतोष बांगर यांनी मतदान करताना आता मोबाईल फोन नेला आणि मोबाईलने मतदानाचे दृश्य शूट केले. शिवाय मतदानानंतर तिथेच घोषणा केली. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कानपिचक्यांनंतरही आमदार संजय गायकवाड यांनी माझ्या मुलाची काय चूक झाली, असा सवाल केला.

हे सर्व ताळतंत्र सुटल्याचे लक्षण आहे. ही परिस्थिती वेळीच बदलली नाही तर महाराष्ट्रात जंगलराज सुरू झाल्याचे चित्र लवकरच पाहायला मिळेल. अशा प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी ज्येष्ठ राजकीय नेत्यांना आपल्या कनिष्ठ पदाधिकाऱ्यांना शिस्त लागावी म्हणून पावले उचलावी लागतील. तसेच समाजातील बुद्धिजीवींनी पुढाकार घेऊन लोकशाहीला मारक असलेल्या अशा प्रकारांविरोधात चार शब्द सुनावण्याची गरज आहे. कारण आपण सगळे एकाच तळ्यातील मासे आहोत. पाण्याला विषबाधा झाली तर त्याचा फटका सगळ्यांनाच बसणार आहे.

## पिंपरी येथे महापरिनिर्वाण दिन साजरा...

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०६, धाराशिव :** कळंब तालुक्यातील पिंपरी येथील जिल्हा परिषद शाळेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चव्हाण सर् व ओव्हाळ सर आणि लोखंडे मॅडम, देशमाने मॅडम, क्षीरसागर मॅडम, तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य यांनी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव सांगीतला.

याप्रसंगी गावातील सर्व नागरीक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वार्यक्रमाची शोभा वाढवत सर्वांनी मिळून हा कार्यक्रम सादर केला होता या कार्यक्रमप्रसंगी सर्व उपस्थिताचे शाळेच्यावतीने आभार ही मानले.

## आचार संहिता..

आचारसंहिता लांबे
विचलित होई चित्त
चलनवलन थिजले
खिळून बसले वित्त

योजना लांबणीवर
खवळू लागले पित्त
हे सांगायले चांगले
अडचणींचे निमित्त

कोणकुठे चुका करे
आयोगघालतो गस्त
सुस्पष्ट वरिष्ठ सूचना
मोडूनका बुवाशिस्त

उधळणे सगळे बंद
आश्वासने रे उन्मत्त
मुक स्तंभ नाईलाजे
वाचाळतोंडे बंदिस्त

विरोधी न् सत्ताधारी
अ स्वस्थ हो समस्त
रूटीन कामे कंटाळे
फाईलीपडल्यासुस्त

एक चूक खूप होते
जड सुधारणे दुरुस्त
टपून बसे प्रति पक्ष
डाव कराया उध्वस्त

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# धनसंपत्ती पेक्षा जनसंपत्ती सांभाळा...



मित्रांनो आपल्याला माहित आहे की, कोणताही माणूस त्याच्याकडे असणाऱ्या अमाप धनसंपत्तीने मोठा नाही ठरत तर त्याच्याकडे असणाऱ्या जनसंपत्तीने तो मोठा ठरतो. एखाद्याकडे भरपूर पैसा आहे, आलिशान गाडी व आलिशान बंगला आहे. त्याच्याकडे फार मोठा उद्योग आहे, त्याच्याकडे खूप जमीन व जुमला आहे.

त्याच्याकडे अनेक मोठमोठ्या संस्था व कारखाने आहेत, म्हणून तो माणूस धनाच्या बळाने मोठा असेलही कदाचित परंतु धनसंपत्ती पेक्षा जनसंपत्ती कधीही लाखमोलाची असते. तुमच्याकडे कितीही पैसा असून काही उपयोग होणार नाही. तुमच्या पाठीमागे माणसांचा किती मोठा माहोल आहे यावरून तुमचे मोठेपण सिद्ध होत असते. पैसा तर कामाला येतोच पण जेवढी माणसे कामाला येतात तेवढा पैसा कामाला येत नाही. पैशापेक्षा माणसे महत्वाची असतात, हे अगोदर आपण लक्षात घेऊनच पैसा कमवायचा की माणसे कमवायची हे ठरवले पाहिजे. मित्रांनो जीवनात पैसा माणसाला कधीही कमावता येतो पण जवळची माणसे एकदा तुटली तर पुन्हा त्यांना आपल्या आयुष्यात मिळवणे कठीण जाते. पैसा मेहनतीच्या बळावर कमावता येतो पण माणसे गोड बोलून व त्यांना संकटात व सुखदुःखात साथ देऊन त्यांच्यासोबत मैत्रीचे संबंध अधिक घट्ट केले जातात. आजकाल माणूस थोडाफार पैसा जवळ आला की, लगेच माणसाची बोलण्याची भाषा बदलत आहे. माणूस गर्विष्ठ व अहंकारी बनून स्वतःला श्रेष्ठ व दुसऱ्याला नीच समजत आहे.

त्याला असे वाटत असते की, आता माझ्याकडे भरपूर पैसा आहे, पैशाच्या बळावर मी काहीही खरेदी करू शकतो. आता मला कोणाची गरज नाही. लोकांनी माझ्याकडे यावे पण मी लोकांकडे जाणार नाही, अशी माणसांची भावना बनते. जवळ पैसा आला की माणूस जवळची माणसे विसरतो. मित्र, नातेवाईक, भाऊबहीण व आई वडील यांना विसरून स्वतःच्या मर्जीप्रमाणे जीवन जगत असतो. मित्रांनो तुम्हाला वाटत असेल की, जीवनात पैसा आला म्हणजे कोणीही आपल्या पायाशी लोळण घेईल. पण मित्रहो तुमचा पैसा पाहून माणसे तुमच्याजवळ येतील हे खरे आहे पण ते केवळ स्वार्थासाठी व तुमच्या पैशाकडे बघून ते तुमच्याजवळ येतील. परंतु एकदा तुमचा पैसा संपला की मग मात्र ती माणसे तुम्हाला ढुंकूनही विचारत नाहीत. पण तुम्ही गोड बोलून व माणुसकीचे व्यवहार जपून कमावलेली माणसे निस्वार्थ भावनेने तुम्हाला मदत करतील, तुमच्या सुखदुःखात धावून येतील, तुम्हाला संकट काळात व अडीअडचणीत आर्थिक मदत करतील. तुमच्या वाईट काळात तुम्हाला खंबीरपणे साथ देतील पण केवळ श्रीमंतीला बघून जवळ येणारी माणसे ही तुमच्याकडे जोपर्यंत पैसा आहे तोपर्यंतच तुमच्या सोबत असतील जेव्हा तुमचा पैसा संपून जाईल तेव्हा ती माणसे सुद्धा तुमच्या पासून दूर जातील, तुम्हाला पुन्हा विचारणार सुद्धा नाहीत. ही मानसिकता आजकालच्या लोकांची झाली आहे.

स्वतःचा स्वार्थ पाहून जवळ येणारी माणसे हे आपल्या सुखदुःखात धावून येत नाहीत, आपल्या संकटात व वाईट काळात आपल्या सोबत राहत नाहीत. ज्या माणसांच्या मागे माणसांची संपत्ती आहे ती माणसे या पृथ्वीतलावर सर्वात महान माणसे म्हणून ओळखले जातात. माणसांची संपत्ती जर आपल्या पाठीमागे असेल तर आपण निवडणुकीत सुद्धा सहजपणे विजयी होऊ शकतो. पैशाच्या बळावर आपण काहीही खरेदी करू शकतो पण जिवाभावाची माणसे खरेदी करू शकत नाही. म्हणून माणसांना खूप खूप जपा व डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवून माणसांशी गोड गोड बोला. मग बघा तुमच्या मागे माणसांचा किती मोठा थवा असेल. आणि जर तुमच्या मागे माणसांचा माहोल मोठा असेल तर तुमचा दरारा देखील गावात भारी असेल. जीवनात माणसाने माणसे कमवायला शिकले पाहिजे. कारण जिथे पैसा कामाला येत नाही तिथे माणसे कामाला येतात. मित्रांनो तुम्ही जर मेलात आणि तुमच्या अंत्यविधीला सर्व गाव आले आणि तुमच्या नसल्याने ते ढसाढसा रडले तर समजा तुमच्या जीवनाचे सार्थक झाले. माणसाचे मोठेपण जर बघायचे असेल तर त्याच्या अंत्यविधीला बघा. ज्या माणसाच्या अंत्यविधीला माणसांची रांग लांबच लांब असते, तो माणूस खरच खूप महान व दिलदार आहे म्हणून समजायचे. मेल्यानंतरही लोकांच्या मनावर कायमचे अधिराज्य गाजवायचे असेल तर मित्रांनो माणसांशी गोड बोला, एकमेकांच्या सुखदुःखात धावून जा, निस्वार्थ भावनेने एकमेकांना मदत करा, कडू बोलून माणसे तोडण्यापेक्षा गोड बोलून माणसे जोडा.. चांगले काहीतरी काम करून दाखवा जेणेकरून आपण मेल्यानंतरही लोकांनी आपले नाव काढले पाहिजे की, हा माणूस खूप चांगला, दिलदार व मायाळू होता. मित्रांनो आपण मेल्यावर आपल्याला सोबत काहीच घेऊन जायचे नाही. जगात येताना रिकाम्या हाताने आलोय आणि जातानाही रिकाम्या हाताने जाणार आहोत. म्हणून कोणत्याही गोष्टीचा गर्व करत बसू नका. कोणासोबतही विनाकारण भांडण तंटे करत बसू नका. सर्वांशी आपुलकीने व प्रेमाने वागा. जनहितासाठी व लोककल्याणासाठी चांगली विकास कामे करा. गरजू व निराधार लोकांना आर्थिक मदत करा. महामानव गौतम बुद्ध, रयतेचे राज्य छत्रपती शिवाजी महाराज, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले, भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी जीवनभर जनकल्याणासाठी व लोककल्याणासाठी आपले सारे आयुष्य खर्ची घातले आणि गुलामगिरीच्या खाईत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला न्याय मिळवून दिला.

या महापुरुषांनी स्वतःचा फायदा कधीच बघितला नाही केवळ जनतेचा विकास हेच त्यांचे ध्येय होते म्हणून त्यांनी जनतेसाठी खूप काही कार्य केले. म्हणून मेल्यानंतरही या महापुरुषांच्या नावाचा डंका गल्लीपासून दिल्लीपर्यंत व संपूर्ण जगात वाजत आहे. यांनी जीवनात धनसंपत्तीची काहीच अपेक्षा ठेवली नाही, फक्त जनसंपत्ती हीच धनसंपत्ती समजून आयुष्यभर ते बहुजन समाजासाठी लढत राहिले, झगडत राहिले एवढेच नाही तर आपल्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत ते जनतेसाठी सदैव काम करतच राहिले. म्हणून आज मेल्यावर देखील त्यांची जयंती व पुण्यतिथी संपूर्ण जगात साजरी केली जाते. म्हणून मित्रांनो जीवनात पैशाला महत्त्व द्या पण तेवढेही नाही, महत्त्व द्यायचे जर असेल तर माणसांना महत्त्व द्या आणि माणसे तोडण्यापेक्षा माणसे जोडा म्हणजे धनसंपत्ती पेक्षा जनसंपत्ती सांभाळा हेच या लेखाच्या माध्यमातून समस्त जनतेला जाहीर आवाहन करतो.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अतिवृष्टी अनुदानासाठी ई केवायसी करा : तहसीलदार वाघमारे



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०५, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील सर्व जनतेला आवाहन करण्यात येते की नैसर्गिक आपत्ती मध्ये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे पालम तालुक्यात प्रलंबित ई - केवायसीची संख्या ६२५० असून ही संख्या जास्त प्रमाणात आहे.बऱ्याच शेतकर्यांनी अजूनही ई - केवायसी केलेली नाही असे दिसून येत आहे. ज्या शेतकऱ्यांची ई - केवायसी करायची बाकी आहे त्यांनी आपल्या जवळच्या सीएससी केंद्र किंवा आपले सरकार केंद्र येथे जाऊन ई - केवायसी पूर्ण करायची आहे.

यासाठी आवश्यक असलेला विशिष्ट क्रमांक संबंधित गावच्या तलाठी यांचेकडे उपलब्ध आहे.ज्यांनी ई केवायसी करणार नाही त्या शेतकरी यांना शासनाचे अनुदान मिळणार नाही.त्या मुळे सर्व शेतकरी यांनी ई केवायसी करून घ्यावे तसेच ज्यांचे अनुदान यादीत नाव नाही त्यांनी संबंधित तलाठी कार्यालयाशी संपर्क साधून आधार कार्ड त्यांच्याकडे जमा करावे असे आवाहन तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी केले आहे.

## महाटी येथे महापरिनिर्वाण दिन साजरा...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, मुदखेड (नांदेड) :** भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिन तालुक्यांत विविध ठिकाणी साजरा झाला. त्याचाच एक भाग म्हणून ६ डिसेंबर २०२५ रोजी महाटी ता. मुदखेड येथेही याच पवित्र दिनाचे औचित्य साधत येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सायंकाळी ७ वाजता महाराज्यांच्या अगदी पुतळ्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करुन बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी पुतळा समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, गावकरी व बौद्ध अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या अप्रतिम पुतळ्याला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच प्रस्तूत पुतळा समितीच्या पदाधिकारी व सदस्यांच्या शुभ हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यासह दीपप्रज्वलन करण्यात आले.तेंव्हा सागर खरात यांनी लिहिलेल्या व आनंद शिंदे यांनी गायलेल्या दोनच राजे इथे गाजले कोकण पुण्य भूमिवर या गाण्यातल्या त्या दोन महापुरुषांची महत्ती कळून चुकली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघदिप ढवळे यांनी परिश्रम घेतले.

## दिवाना तेरा आया, बाबा तेरी शिर्डी में गाण्याने पेणचे हजारों साई भक्त मंत्रमुग्ध



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०६, पेण :** दिवाना तेरा आया, बाबा तेरी शिर्डी में या संपूर्ण देशात गाजलेल्या गाण्याने पेणसह रायगड जिल्ह्यातील हजारों साई भक्त मंत्रमुग्ध झाले. ओम साई पदयात्रा मित्र मंडळ तर्फे भव्य साई भंडाऱ्याचे साई सहारा रेस्टॉरंट, पेण येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. जिल्ह्यातील हजारों साई भक्तांची उपस्थिती असलेल्या या कार्यक्रमासाठी दिल्लीवाले प्रसिद्ध गायक सुफि ब्रदर्स यांनी गायनाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात सादर केला.

साई भंडारा कार्यक्रमाला सायंकाळी ६.०० वाजता श्री साई भजनाने सुरुवात होऊन सायंकाळी ७.३० वाजता हजारो महिला-पुरुष व आबालवृद्ध साई भक्तांच्या उपस्थितीत बाबांची धूप आरती झाली. तर रात्री ९.०० वाजता श्री साई भंडाऱ्यानिमित्त महाप्रसाद संपन्न झाला.

सदर साई भंडाराला विशेष आकर्षण म्हणून हम्सर हयात, अथर हयात निजामी व सुफि ब्रदर्स (दिल्लीवाले) यांनी भजनसंध्या व ऑर्केस्ट्रा सादर करत माझे साई बाबा, साई का दीदार, चढता सूरज ढळता, दिवाना तेरा आया बाबा तेरी शिर्डी में अशी अनेक गाणी गात उपस्थित हजारो साई भक्तांना अनोखा भक्तिरसाचा अनुभव दिला. सर्व साईभक्तांनी या भक्तिमय साई भंडारा कार्यक्रमाचा लाभ घेत आनंद लुटला. सदर साई भंडारा कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन ओम साई पदयात्रा मित्र मंडळाचे सर्वेसर्वा कल्पेश ठाकूर, मितेश भानुशाली व सर्व सदस्यांनी केले.

## चिंतलधाबा येथे प्राथमिक उपकेंद्राचे भूमिपूजन



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.०६, पोंभुर्णा :** महिला सक्षमीकरनं व आर्थिक स्वालंबनासाठी कार्यरत असलेले राज्याचे माजी वने सांस्कृतिक कार्य व मत्स्य मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते यांच्या दि.५डिसें. रोजी ग्रामपंचायत चिंतल धाबा येते नवीन आरोग्य उपकेंद्र इमारत भूमिपूजन व ग्रामपंचायत चिंतलधाबा व महिला आर्थिक विकास महामंडळ चंद्रपूर यांच्या संयुक्त उपक्रमातून सुरु करण्यात येत असलेल्या कार्पेट निर्मिती केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

भूमिपूजन सोहळा व उदघाटन सोहळा उपस्थित प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, तालुका अध्यक्ष हरिदास ढवस, सरपंच शुभांगी कुत्तारमारे, उपसरपंच रोशन ठेंगणे, कृषी बाजार समिती सभापती रवीभाऊ मरपालिवार, बंडू भाऊ बुरांडे, महिला तालुका अध्यक्ष वैशाली बोलमवार, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अजय मस्के, ग्रामपंचायत सदश्य निवुता कुडमेथे, दौलत नेवारे, साधुराम कडते, गजानन राजूरकर, मंगलाबाई कुळमेथे, मंगेश महादासवार, आकाश शेंडे, बचत गटाच्या महिला व गावकरी उपस्थित होते. संबोधीत करताना सुधीर मुनगंटीवार ग्रामपंचायत चिंतलधाबाला आदर्श स्मशान भूमिकारिता निधी मंजूर करू. गावातील संपूर्ण घरे सोलर करण्या करिता मदत करू तसेंच कार्पेट निर्मिती केंद्रातील प्रशिक्षणनार्थी महिलांना स्टाईफंड देण्याची सोय करू असे सांगितले.

# शिक्षकांच्या आंदोलनामुळे जिल्ह्यातील १७८६ शाळा बंद

## टीईटी सक्तीविरोधात शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्णची जाचक अट रद्द करावी, जुनी पेन्शन योजना कायम ठेवावी व इतर मागण्यांसाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर संघटनांनी आज, शुक्रवारी शाळा बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

आंदोलनामुळे जिल्ह्यातील ३ हजार ४३३ प्राथमिक शाळांपैकी १ हजार ७८६ शाळा बंद होत्या. या शाळांमधील ५ हजार ५१४ शिक्षक आंदोलनात सहभागी होते. या सर्व शिक्षकांवर वेतन कपातीची कारवाई होणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक, खासगी अनुदानित, अंशत अनुदानित, विना अनुदानित अशा सर्व शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचार्यांनी विविध मागण्यासाठी शाळा बंद आंदोलनाची हाक देत मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. त्यावर शिक्षण संचालनालयाने आंदोलनात सहभागी होणार्यांचे वेतन कपात करण्याचा निर्णय घेतला. मात्र, शिक्षक संघटना आंदोलनावर ठाम होत्या.

**बंद शाळा व सहभागी शिक्षक**

अहिल्यानगर १४० शाळा,५३२ शिक्षक, नेवासा १२२ शाळा,४४५ शिक्षक, पारनेर,१७९ शाळा ५३२ शिक्षक, पाथर्डी ५१ शाळा,१७१ शिक्षक. शेवगाव ४३ शाळा,१८२ शिक्षक. अकोले ३११ शाळा ७८६ शिक्षक. संगमनेर २६२ शाळा,८७२ शिक्षक. श्रीगोंदा १२२ शाळा,३२८ शिक्षक. कर्जत १०९ शाळा १९८ शिक्षक. राहुरी २२८ शाळा ,३५१ शिक्षक. राहाता ४१ शाळा,१९० शिक्षक. जामखेड १५० शाळा,४६६ शिक्षक. कोपरगाव ९८ शाळा,२६५ शिक्षक. श्रीरामपूर ४० शाळा,१९६ शिक्षक. एकूण १ हजार ७८६ शाळांतील ५ हजार ५१४ शिक्षक सहभागी झाले होते. या सर्व शिक्षकांवर वेतन कपातीची कारवाई केली जाणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.



संचमान्यतेमुळे ग्रामीण भागासह राज्यातील जवळपास २५ हजार शाळा बंद होणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गरज आहे. संचमान्यता आणि टीईटी बंधनकारक करण्याच्या निर्णयावर राज्य सरकार कोणतीही ठोस भूमिका घेत नाही. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत तडजोड न करता राज्यभरात शाळा बंद ठेवण्याचा निर्धार शिक्षकांनी व्यक्त केला होता. काल जिल्ह्यातील सुमारे दोन हजारावर शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना मागण्यांचे निवेदन दिले.

यावेळी आमदार सत्यजित तांबे, संघटनेचे पदाधिकारी रावसाहेब रोहकले, आबासाहेब जगताप, संजय धामणे, भाऊसाहेब चासकर, संजय कळमकर, अप्पासाहेब शिंदे, सुनील पंडित, महेंद्र हिंगे, बाबासाहेब बोडके आदी उपस्थित होते.

# नागपूर येथे संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६, विंचूर (नाशिक) :** संत नामदेव महाराज शिंपी समाजातर्फे देशातील सर्व पोटजातींना एकत्र आणणारे 'संत नामदेव महाराज राष्ट्रीय एकात्मता विश्व महासंमेलन' हे भव्य, दिव्य आणि ऐतिहासिक जागतिक महासंमेलन १७ व १८ जानेवारी रोजी नागपूर येथील रेशीमबाग मैदानात अत्यंत श्रद्धा आणि उत्साहात पार पडणार आहे. भारतात प्रथमच या स्वरूपाचे जागतिक स्तरावरील महासंमेलन आयोजित होत असून समाजात मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात आहे.

या दोन दिवसीय महायज्ञातून एक नाम, एक विचार, एक भारत हा संत नामदेव महाराजांचा वैश्विक संदेश सर्वदूर पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. समाजातील सर्व घटकांनी व पोटजातींनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहून या महाऐतिहासिक सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**प्रमुख उपस्थिती :** या दिव्य सोहळ्यास देशातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची गौरवशाली उपस्थिती लाभणार आहे : देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी, पूजनीय सरसंघचालक मा. श्री मोहनजी भागवत, विश्व आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर महाराज, केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री मा. शिवराजसिंह चौहान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. अजित पवार, उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, श्रीनाथपीठ देवनाथ मठाचे मठाधिपती प.पू. स्वामी जितेंद्रनाथ महाराज,प.पू. स्वामी प्रमोदगिरी महाराज,नागपूर पालकमंत्री मा. चंद्रशेखर बावणकुळे, तसेच देशभरातील असंख्य संत, समाजप्रमुख, राष्ट्रीय समाजनेते आणि मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाची शोभा वाढवणार आहे. संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या वंशजांचा संपूर्ण परिवारही समाजबांधवांना आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित राहणार आहे.

**विशेष गौरव :** संत शिरोमणी श्री नामदेव महाराज विश्व पुरस्कार या महासंमेलनात केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी यांना संत शिरोमणी श्री नामदेव महाराज विश्व पुरस्कार प्रदान केला जाणार असून, हा समाजासाठी अत्यंत अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.

**समाजबांधवांसाठी आवाहन :**

या कार्यक्रमाची माहिती प्रत्येक घटकापर्यंत स्पष्टपणे पोहोचावी म्हणून आयोजन समितीने ही रूपरेषा जाहीर केली आहे. समाजातील सर्वांनी तन-मन-धनाने सहकार्य करून, परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**नाशिक जिल्हा आयोजन समिती :** अतुल मानकर, अरुण नेवासकर, वृषाली तुपसाखरे, प्रवीण पवार(नाशिक), दत्ता वावधने(नाशिक),राजेंद्र करमसे, वनेश खैरनार, ज्ञानेश्वर भांबारे, रविंद रहाणे, श्याम रहाणे, दत्ता शिंपी, अरविंद टापसे (लासलगाव), अनिल खांबेकर (नाशिक), योगेश वारे, कीरण नवले (विंचूर), सुनील क्षिरसागर (विंचूर), कीर्ती निरगुडे, गायत्री लचके इ. मान्यवरांशी अधिक माहितीसाठी संबंधित सदस्यांशी संपर्क साधावा.

# बल्लारपूर मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या स्वावलंबनाचा नवा अध्याय सुरू होणार

## महिला बचत गट बाजारपेठेचे आ.मुनगंटीवार यांच्या हस्ते भूमिपूजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** महिला सक्षमीकरण आणि आर्थिक स्वावलंबनासाठी सातत्याने कार्यरत असलेले राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते दि. ५ डिसेंबर रोजी पोंभूर्णा येथे महिला बचत गट बाजारपेठेचे भूमिपूजन झाले. या उपक्रमाच्या माध्यमातून लाडक्या बहिणींसाठी रोजगाराच्या नव्या अध्यायाची सुरुवात होत असल्याचा आनंद आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.




या बाजारपेठेच्या माध्यमातून केवळ पोंभूर्णाच नव्हे, तर संपूर्ण बल्लारपूर मतदारसंघातील महिलांच्या सक्षमीकरणाला आणि स्वावलंबनाला नवी दिशा मिळेल, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. पोंभूर्णा येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून आयोजित महिला बचत गट बाजारपेठ भूमिपूजन सोहळा आणि बचत गट महिला मेळाव्याला अतिरिक्त मुख्य कार्याधिकारी कल्पना क्षीरसागर, प्रदेश महामंत्री अल्का आत्राम, किसान आघाडी जिल्हाध्यक्ष बंडू गौरकार, तहसीलदार मोहनीश शेलवटकर, नगरपंचायत मुख्याधिकारी निखिल लांडगे, तालुकाध्यक्ष हरीश ढवस, सुलभाताई पिपरे, ऋषी कोटरंगे, अजित मंगळगिरीवार, विनोद देशमुख, गुरुदास पिपरे, ज्योती बुरांडे, वैशाली बोलमवार, अजय मस्के, गंगाधर मडावी, बंडू बुरांडे, ईश्वर नैताम, ओमदास पाल आणि आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

या सोहळ्यात उमेदच्या 'यशोगाथा' पुस्तिकेचे विमोचन तसेच कृषी विभागाच्या एआय आधारित शेतीविषयक माहितीपत्रकाचे लोकार्पण आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'मुल, पोंभूर्णा आणि बल्लारपूर येथील बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. आज पोंभूर्णा येथे १ कोटी रुपये निधीतून होत असलेल्या बाजारपेठेच्या भूमिपूजनाच्या निमित्ताने यशस्वी पाऊल टाकण्यात आले आहे, ही अतिशय समाधानाची बाब आहे.

पोंभूर्णा येथील महिला बचतगटांच्या बाजारपेठेचे भूमिपूजन निश्चितच बल्लारपूर मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या स्वप्नांना बळ देईल.' महिला व शेतकरी बांधवांसाठी चंद्रपूर जिल्ह्यात उभारण्यात येत असलेली ८० कोटी रुपयांची महाराष्ट्रातील सर्वात मोठी आधुनिक बाजारपेठ स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा आधार देणार असल्याचा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, महिलांच्या हाताला रोजगार मिळणे म्हणजे एका कुटुंबाची, एका समाजाची आणि पुढील पिढीची प्रगती होय. यासाठी बचतगटांनी कष्टाने तयार केलेल्या वस्तूंना योग्य बाजारपेठ मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या परिश्रमाला योग्य किंमत मिळावी, त्यांच्या उत्पादनांना खात्रीशीर मागणी निर्माण व्हावी आणि त्यांचे उत्पन्न वाढत राहावे, यासाठी सशक्त, कायमस्वरूपी आणि आधुनिक बाजारपेठ निर्माण करणे हा आपल्या प्रयत्नांचा केंद्रबिंदू आहे.

महिला बचत गटांनी उद्योगातून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याचे जे स्वप्न डोळ्यासमोर ठेवले आहे, ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण शासनस्तरावर, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आणि खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने सर्वतोपरी प्रयत्नशील आहोत. त्यांना प्रशिक्षण, वित्तीय मदत, विक्रीचे मार्ग आणि तंत्रज्ञानाची जोड मिळावी, यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील. महिलांच्या प्रगतीशिवाय समाजाचा विकास अपूर्ण आहे. म्हणूनच त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी पुढे उचललेले प्रत्येक पाऊल भविष्यातील मजबूत समाजव्यवस्थेचा आधारस्तंभ ठरेल, याची जाणीव ठेवून आपण कार्यरत आहोत, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले.

# दादरच्या चैत्यभूमी येथे ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, मुंबई :** भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. इतक्या मोठ्या राष्ट्रात एकता, न्याय व समतेची संघटित भावना दृढ करण्यासाठी संविधान निर्माण करणे हे अत्यंत मोठे व ऐतिहासिक कार्य होते. देशाच्या सामाजिक विविधतेत सर्वांना एकत्र आणणारे आणि समान अधिकार प्रदान करणारे संविधान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्राला दिले, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.



मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार चित्रा वाघ, आमदार अमित साटम, माजी खासदार तथा महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र जाधव, माजी खासदार राहुल शेवाळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ.बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, कोणत्याही राष्ट्रात युगपुरुष जन्माला येतात तेव्हा सामाजिक न्यायाची चळवळ बळकट होते. असे युगपुरुष व्यक्तिमत्त्व जगातून गेले तरी त्यांचे विचार व कार्य जनतेच्या अंत:करणात सदैव जिवंत राहतात, त्यातूनच बाबासाहेब अमर आहेत. कठोर परिस्थितीतून शिकून त्यांनी संपूर्ण समाजाचा भविष्यकाळ बदलण्यासाठी शिक्षणाला सर्वात मोठे शस्त्र मानले. एक सुशिक्षित व्यक्ती संपूर्ण घराचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य बदलू शकतो हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दिला.

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीमुळे भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्राच्या प्रगतीचा पाया घातल्याचे नमूद करून बाबासाहेबांच्या दूरदृष्टी मुळे आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था ठरला असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर झेप घेणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ऊर्जा सुरक्षेच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांचे योगदान अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय विद्युत ग्रीडची संकल्पना भारताने बाबासाहेबांमुळे वेळेत स्वीकारली. त्यातून देश ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी आणि सामान्य जनतेच्या हक्कांचे रक्षण हे बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य झाले.समाजात विषमता दूर करून समता, बंधुता आणि सर्वांना समान संधी देणारे संविधान देशाला दिले.

ज्ञानाच्या बळावर त्यांनी समाजात समतेची जाणीव दृढ केली जगातील सर्वोत्तम संविधान भारताकडे असून प्रत्येक प्रश्नाचे उत्तर याच संविधानात मिळते, असे त्यांनी नमूद केले.आगामी काळात चैत्यभूमी परिसरातील स्मारक विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**महामानव बाबासाहेबांचे विचार राष्ट्राला मार्गदर्शक - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून देशाच्या लोकशाहीला दृढ पाया दिला. त्यांनी उभारलेला संघर्ष हा मानवमुक्तीचा, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्याचा होता, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ही बाबासाहेबांनी जगाला दिलेली त्रिसूत्री आजही समाज परिवर्तनासाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार मूल्यांवर आधारित संविधान तयार करून तळागाळातील वंचित व दुर्बल घटकांना सशक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ. आंबेडकरांनी केले, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले.

यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सर्व भिक्खूंना चिवरदान देण्यात आले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य त्रिभाषा धोरण समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र जाधव यांनी सर्व मान्यवरांना संविधानाची प्रत दिली.

# अहिल्यानगरच्या रेल्वे प्रकल्पांना गती द्या; खा.लंके यांचे रेल्वेमंत्र्यांना पत्र

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, अहिल्यानगर :** अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील विविध महत्त्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांच्या प्रस्तावांची अद्ययावत स्थिती जाणून घेण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केंद्राचे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना सविस्तर पत्र लिहून पाठपुरावा अधिक वेगाने करण्याची मागणी केली आहे. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या ८ प्रमुख रेल्वे प्रस्तावांवर लंके यांनी तातडीने अहवाल सादर करण्याची विनंती केली आहे.

पुणे - अहिल्यानगर इंटरसिटी गाडी सुरू करण्याबाबत पूर्वी पाठवलेल्या प्रस्तावाची सद्यस्थिती कळविण्याची खासदारांनी मागणी केली आहे. या गाडीमुळे दोन्ही शहरांतील रोजगार, व्यवसाय आणि शिक्षणाच्या संधींना चालना मिळेल, असेही त्यांनी पत्रात नमूद केले आहे.



अहिल्यानगर - चोंडी (जेऊर-चोंडी) नवीन रेल्वे मार्गाचा प्रस्ताव गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित आहे. या प्रस्तावाच्या अभ्यास व निर्णय प्रक्रियेची स्थिती तत्काळ कळवावी, अशी लंके यांची विनंती आहे. संभाजीनगर - अहिल्यानगर - पुणे नवीन रेल्वे लाईन या बहुप्रतिक्षित नव्या रेल्वे मार्गाबाबत वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप स्पष्ट स्थिती मिळालेली नाही. मार्गाचा सर्वेक्षण, डीपीआर, मंजुरी प्रक्रिया आणि पुढील टप्पे कोणत्या अवस्थेत आहेत, हे कळवण्याची विनंती खासदारांनी केली आहे.

श्रीरामपूर - शनिशिंगणापूर रेल्वे लाईन या मंजूर रेल्वे मार्गासाठी भू - अधिग्रहण प्रकिया लवकर सुरू व्हावे. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. भूसंपादन कधी आणि कशा पद्धतीने होणार याबाबत माहिती देण्याची विनंती केली आहे. अहिल्यानगर स्थानकाजवळील एलसी क्र. ३० येथे आर ओबी बांधकामाच्या प्रस्तावाची अद्यावत स्थिती कळवावी, अशी मागणी खासदारांनी केली आहे. अपघात मुक्त वाहतुकीसाठी हा पूल अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. राहुरी तालुक्यातील बांबोरी येथे गेट क्रमांक ३५ (ब) असलेल्या ठिकाणी आरबीओ मंजूर झाल्याचे नमूद करून,काम सुरू होण्याची निश्चित तारीख कळवावी, अशी विनंती लंके यांनी केली आहे.

# मांडवे खुर्द शाळेत श्रीमद् भगवद्गीता जयंती साजरी

## तिसरीतील विद्यार्थ्यांकडून बाराव्या अध्यायाचे संस्कृत पठण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत गीता जयंती कार्यक्रम आगळ्यावेगळ्या पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यात विविध अध्यात्म, संस्कार आणि मूल्य शिक्षण यांचा सुंदर संगम पहायला मिळाला. शाळेतील तिसरीच्या विद्यार्थ्यांनी गीतेतील बारावा अध्याय प्रभावीपणे पठण करून 'संस्कारक्षम जीवन' हा उपक्रम राबविला. या प्रसंगी विद्यार्थी, मुख्याध्यापक शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते श्रीमद् भगवद्गीता प्रतिमा व ग्रंथाचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना गीतेतील विचार, मूल्य आणि संस्कृत भाषेची प्राथमिक ओळख करून देण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. गीतेतील संस्कृत शब्दांची कठीणता लक्षात घेता ग्रामीण व दुर्गम भागातील तिसरीच्या विद्यार्थ्यांकडून हा अध्याय केवळ वाचनच नव्हे तर पाठांतर करून सुंदर रीतीने सादर करणे ही शाळेसाठी अभिमानाची बाब असल्याचे मत शाळा व्यवस्थापन समितीने व्यक्त केले.

निपुण भारत सारख्या योजनांद्वारे शासन विद्यार्थ्यांकडून मराठी लेखन-वाचनावर भर देत असताना, मांडवे खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांनी संस्कृतसारख्या कठीण भाषेतील अध्याय सहज आत्मसात केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीसाठी आध्यात्मिक साहित्यातून मिळणारे सद्गुण अत्यंत आवश्यक आहेत. गुणांपेक्षा सद्गुण महत्त्वाचे असून अशा उपक्रमांतून विद्यार्थी चांगले नागरिक म्हणून घडतात, अशी भावना येथील शिक्षकांनी व्यक्त केली. वर्गातील विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिलीत हनुमान चालीसा, इयत्ता दुसरीत नवरात्रोत्सवानिमित्त महिषासुरमर्दिनी स्तोत्र, तर यावर्षी संस्कृत भगवद्गीतेतील बारावा अध्याय यांचे पठण केले आहे. या उपक्रमासाठी वर्गशिक्षिका प्रितम बर्वे, मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे, संदिप गाडे, मंगल झावरे, लता शिरसाठ, शैलजा झावरे आणि बाळासाहेब खराबी यांचे मार्गदर्शन लाभले.

# कर्जुलेहार्या येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** ४५ वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासानंतर जनतेच्या प्रेमातून व विश्वासातून मिळालेल्या पदाचा वापर मी जनहिताची कामे मार्गी लावण्यासाठीच करत असून राजकीय आकसातून होत असलेली टीका, व्यक्तीद्वेषातून केला जाणारा विरोध ह्या सगळ्याकडे लक्ष द्यायला मी वेळच शिल्लक ठेवत नाही. त्यामुळे कुणी निंदा अथवा वंदा.. जनसेवा हाच माझा धंदा या तत्वाने माझी वाटचाल चालू असून यापुढील काळातही ती त्याच पद्धतीने सुरु राहील असा विश्वास आमदार काशिनाथ दाते यांनी कर्जुले हर्या, ता.पारनेर येथिल विविध विकासकामांच्या भुमिपूजन प्रसंगी बोलताना उपस्थित नागरिकांना दिला.

यावेळी पंढरीनाथ उंडे, साहेबराव दादा वाफारे, देवराम मगर, सरपंच शिवाजी निमसे, एल के झावरे गुरुजी, बाळशिराम आंधळे, ज्ञानदेव शिंदे, वसंत दातीर, सरपंच सुनिता मुळे, संजीवनी आंधळे यांच्यासह अनेक कार्यकार्त्यांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार दाते यांनी सांगितले की, विकास ही न थांबणारी प्रक्रिया असून पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात एका वर्षात नगरपंचायत क्षेत्रासाठीच्या १७-१८ कोटी रुपयांविरहीत जवळपास ९० कोटी रुपयांची विविध विकासकामे मार्गी लावण्यात यश आले असून यापुढील काळात विकासाची ही प्रक्रिया अधिक गतिमान होईल. ह्या सगळ्या व्यतिरिक्त महामार्गांची कामे ही प्रगती पथावर आहेत. पाठरभागासह तालुक्यातील कोरडवाहू भागासाठीच्या पाणी योजना कार्यान्वित करण्यावरही प्राथमिक स्वरूपात काम सुरु असून अतिवृष्टीच्या नुकसानभरपाई पासून वंचित राहिलेल्या कान्हूर पठार व पारनेर मंडळातील शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठीचे प्रयत्न ही सुरु आहेत.

# थोडक्यात

## कोपरखैरणे बोनकडे येथे श्री दत्त जयंती उत्साहात साजरी




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०६, नवी मुंबई :** कोपरखैरणे बोनकडे से १२ अ. येथे श्री हनुमान चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे श्री. दत्त जयंती उत्साहात साजरी झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंती सोहळा भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवार आल्याने विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. मंदिरामध्ये वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी अभिषेक, भजन, हरिपाठ, ह.भ.प. लता तुळशीराम नाईक यांचे सुश्राव्य प्रवचन झाले. सायंकाळी सहा वाजता श्री दत्तप्रभू जन्मोत्सवाच्या वेळेला महिला मंडळांनी पाळणा गीत गाऊन जन्म सोहळा साजरा केला. परिसरातील भावीकांमुळे या उत्साहाला जत्रेचे स्वरूप आले. सुप्रसिद्ध रांगोळी यांची खास आकर्षक रांगोळी फुलांची सजावट व विद्युत रोशनाईने परिसर उजळून निघाला. जन्मोत्सवानंतर सुंठवडा व प्रसाद वाटप करण्यात आले. रात्री ८ ते १० वाजता संत ज्ञानेश्वर माऊली प्रसादिक मंडळ घनसोली यांचे सुश्राव्य भजन झाले हजारो भक्तांनी आपल्या कुटुंबासह दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला. सोहळा यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे सुधाकर पाठक, शीहरी पवळे, संतोष मडव, विजय नरावडे तसेच विघ्नेश नायक, प्रकाश थोरात, सुभाष कांबळे, स्वानंद अत्रे, ए.एस पाटील, केसरे, लोखंडे व्हटकर, महाडिक शार्दुल सुरज चौधरी, अजय निवडे, मार्गदर्शक खासदार डॉ.संजीव नाईक, सल्लागार नगरसेवक विलास नाईक, मार्गदर्शक उद्योजक महेश नाईक, सुनील नाईक या सोहळ्यानिमित्त योगदान लाभले. बनकोडे परिसरात भक्तीमय वातावरण झाल्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

## जागतिक मृदा दिन कार्यक्रम संपन्न




**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** दिनांक ०५ डिसेंबर २०२५रोजी सकाळी ११ वाजता शहापूर तालुक्यात मौजे मळेगांव महालक्ष्मी मंदिर मध्ये महाराष्ट्र शासन कृषि विभाग यांच्या वतीने ०५ डिसेंबर जागतिक मृदा दिन कार्यक्रम, राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन, ॲग्रीस्टॅक, महाविस्तार ॲप, पीएम किसान, भात पिक नुकसान तसेच कृषि विभागाच्या विविध योजना विषयी कार्यक्रम पार पाडला.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषि अधिकारी भगवान पथारे तसेच प्र.मंडळ कृषि अधिकारी अशोक पवार, उपकृषी अधिकारी रमेश सुरशे सहाय्यक कृषि अधिकारी मुकेश माळी, प्रदीप मराठे, संदीप पवार, बाबासाहेब पाडेकर, सूरज सूर्यवंशी, नेहा खुताडे, अश्विनी वेहळे, मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी प्रयोग शाळा ठाणे च्या स्नेहल वाळंज, अक्षता धेंडे तसेच आत्माचे विनोद कदम, जितेश खांडगे उपस्थित राहून शेतकऱ्यांना मागदर्शन केले. कार्यक्रमाला मळेगांव ग्रुप ग्रामपंचायत सदस्य अविनाश पडवळ तसेच किसन शिर्के, नरेश चौधरी, विठ्ठल पडवळ, पुंडलिक पडवळ, जगन्नाथ पडवळ, लक्ष्मण पडवळ, विलास पडवळ, सुरेश पडवळ, कृषि सखी तनुजा पडवळ, निकिता म्हसकर, उषा पडवळ तसेच आदी शेतकरी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोंबिवलीत १२ डिसेंबरपासून सुरू होणार '२१ वा अखिल भारतीय आगरी महोत्सव'



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०६, डोंबिवली (ठाणे) :** आगरी युवा मंचतर्फे आयोजित २१ वा अखिल भारतीय आगरी महोत्सव १२ ते १९ डिसेंबर २०२५ दरम्यान श्रीसंत सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुल, डोंबिवली पूर्व येथे उत्साहात पार पडणार आहे. २००४ पासून सुरू झालेल्या या महोत्सवाची आगरी समाजासह ठाणे, रायगड, पालघर आणि मुंबईकरांमध्ये मोठी प्रतिक्षा असते. महोत्सवाचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कसोटीवीर निलेश कुलकर्णी आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते होणार आहे. रामशेठ ठाकूर, कपिल पाटील, गणेश नाईक, सुरेश (बाल्या मामा) म्हात्रे, डॉ.श्रीकांत शिंदे यांसारखे मान्यवर उपस्थित राहतील. ८ दिवस चालणाऱ्या या महोत्सवात आगरी-कोळी गीत-नृत्य, स्वादिष्ट खाद्यपदार्थ, भव्य स्टॉल्स, आकाश पाळणा, भजन संध्या, महिलांसाठी विशेष दिवस आणि नवोदित कलाकारांचे कार्यक्रम अशी विविध आकर्षणे असतील. सावळाराम महाराज व दिवंगत बा. पाटील यांच्या कार्यावर आधारित परिसंवाद, तसेच डॉ.अच्युत गोडबोले यांचे अख विषयक मार्गदर्शन आणि डॉ. गायत्री पाटील यांचे तारुण्य विषयक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. १५ डिसेंबरला राज्यस्तरीय आगरी बोली भाषा साहित्य संमेलनही होणार आहे. महोत्सवातून जमा निधीतून समाजातील गुणवानांना पुरस्कार, तसेच ५० गरजू विद्यार्थ्यांसाठी ५ लाखांचा शैक्षणिक निधी जाहीर करण्यात आला आहे. महोत्सवात सहभागी होऊन आनंदाची ही पर्वणी अनुभवण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संविधानाचे पालन हीच खरी राष्ट्रसेवा - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आ. किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याल्याही माल्र्यापण करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, बहुजन महिला आघाडी प्रमूख विमल कातकर, विधानसभा अध्यक्ष वंदना हातगावकर, युवा मोर्चा अध्यक्ष मयुर हेपट, मंडळ अध्यक्ष सुभाष अदमाने, स्वप्निल डुकरे, महामंत्री सविता दंढारे, श्याम कनकम, माजी नगरसेविका पूष्पा उराडे, सुषमा नागोसे, खुशबु चौधरी, कल्पना शिंदे, दुर्गा वैरागडे, आशु फुलझेले, नितेश गवळी, शितल गुरनुले आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आ.किशोर जोरगेवार म्हणाले कि, महापरिनिर्वाण दिन हा केवळ स्मरणाचा नाही, तर जागृतीचा दिवस आहे. बाबासाहेबांनी समाजाचे रुपांतर केले. त्यांनी अंधारातून प्रकाशाकडे, गुलामगिरीतून स्वाभिमानाकडे आणि अन्यायातून न्यायाकडे नेणारा मार्ग दिला. आज आपण त्यांच्या विचारांवर चालणे हीच खरी आदरांजली आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हे आपल्या देशाचे बळ आहे.